# छंद पुष्परचनेचा - २६

सोबतच्या फोटोमध्ये पसरट लाकडी फ्लॉवर वाज वापरला आहे. लाकडी असल्यामुळे त्यात पाणी घातल्यास खराब होईल. त्यामुळे वाजच्या डाव्या बाजूला एका छोटा प्लॅस्टिकचा डबा ठेवून त्यात फ्लोरल स्पंज घालून रचना केली आहे.



ही रचना पाहताना त्यातील साधलेला बॅलन्स बघणे महत्त्वाचे आहे! वाजच्या डावीकडील भागात रचना लावली आहे. त्यामुळे उजव्या बाजूकडे येणाऱ्या फांद्या लावून रचनेचा बॅलन्स साधला आहे.

अगदी कमी फुलांमध्ये केलेल्या या रचनेमध्ये दोन रंगांची शेवंती व पांढऱ्या फिलर्सच्या नाजूक फांद्या वापरल्या आहेत. त्याचबरोबर फर्नची २-३ पाने वापरली आहेत.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर

asdssd@gmail.com